**जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे कार्यालय**

क्र.कार्या-5/मगांराग्रारोहयो/सलेअ/154/17

दिनांक :- 07 ~~जून~~ जुलै, 2017

विषय :- **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना- 2005**
मगांराग्रारोहयो अंतर्गत साहित्य छपाई करून पुरविण्याकरिता दरपत्रक मागविण्यासाठी सुचना.

संदर्भ :- 1) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्र क्र. /जिपग/मगांराग्रारोहयो/आस्था./145/2017 दिनांक 30 मार्च, 2017.

2) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (मग्रारोहयो) जि.प. गडचिरोली यांचे कार्यालयाचे पत्र क्र 172/17 दिनांक 1 7 एप्रिल.2017

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वित्तीय वर्ष 2017-2018 च्या तहसिल व पंचायत समितीस्तरावर पुरवठा करावयाचा असल्यामुळे सदर नियोजन पुस्तिका 240 प्रती, मास्टर सर्कूलर 150 प्रती व ॲसेट रजिस्टर 200 प्रती छपाई करुन पुरविण्याकरिता अधिकृत मुद्रणालयधारकाकडुन मोहोरबंद दरपत्रक मागविण्यात येत आहे. दरपत्रक सादर करण्याचा कालावधी दिनांक 07 जुलै, 2017 ते 14 जुलै, 2017 ला दुपारी 02.00 वाजता पर्यंत राहिल. प्राप्त दरपत्रके दिनांक 15 जुलै, 2017 ला सकाळी 12.00 वाजता उघडण्यात येईल. या कार्यालयास सादर करावयाच्या दरपत्रकाबाबत विहीत अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.

अटी व शर्ती

1. मुद्रणालयधारक अधिकृत परवानाधारक असावा.प्रत्येक मुद्रणालयधारकास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल.
2. यशस्वी दरपत्रक हे नमुद केलेल्या एकुण साहित्याची पुर्तता करणारे सर्वात कमी किमतीचे दरपत्रक असेल.
3. मुद्रणालयधारकाने दरपत्रक सादर करतांना त्यांचा VAT/CST/GST क्रमांक दरपत्रकावर ठळक पणे नोंदवावा. तथापी ज्या मुद्रणालयधारकास VAT/CST/GST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या लेटर हेडवर दरपत्रक देण्यात यावे. तसेच दरपत्रकासोबत मुद्रणालयधारकाचे पॅन कार्डची सांक्षाकीत प्रत जोडणे आवश्यक राहिल.
4. दरपत्रक सादर करणाऱ्या मुद्रणालयधारकाची मागील आर्थिक वर्षातील उलाढाल रू. 5 लक्ष पेक्षा अधिक असावी.
5. मागील दोन वित्तीय वर्षात मुद्रणालयधारकाने शासकीय कार्यालयास मागणीनुसार योग्यरित्या पुरवठा केलेला असावा. सदर कार्यालयास यापुर्वी पुरवठा केलेला असल्यास याबाबत योग्य दस्ताऐवज जोडण्यात यावे.
6. नियोजन पुस्तिकीचे सर्वसमावेशक दर, दरपत्रकामध्ये नमुद करणे आवश्यक राहील. सदर साहित्य छपाईचे आदेश मिळताच सात दिवसाच्या आत या कार्यालयास पुरवठा करावा लागेल..
7. या कार्यालयास सादर केलेली दरपत्रके निर्धारित दिनांकास व वेळेस उघडतांना मुद्रणालयधारक किंवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणे अपेक्षित राहिल.

उपजिल्हाधिकारी (रोहयो),
गडचिरोली